**स्वच्छता हीच सेवा**

दिनांक २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना दिवस आणि ०२ ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त एमईटी भुजबळ नॉलेज सिटी येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात आले.

रविवार दिनांक २४ सप्टेबर रोजी महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी शहर व परिसरातील काही वृध्दाश्रम, अनाथाश्रम तसेच आश्रम शाळेत जावून स्वच्छता केली आणि आरोग्याविषयी आणि स्वच्छतेविषयी जनजागृती केली. महाविद्यालयाचा वतीने हातांची स्वच्छता याविषयीचे पत्रक आणि द्रव्य साबणांचे वाटप करण्यात आले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त राबविण्यात आलेल्या आणखी एका उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी वात्सल्य वृध्दाश्रम येथे जाऊन स्वच्छता मोहीम राबविली , तसेच वृद्धाश्रमातील सर्व सदस्यांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधांचे वाटप केले. सदर ऊपक्रामास कासलीवाल हॉस्पिटल नाशिक येथील डॉ. राहुल कासलीवाल आणि डॉ. वैभव अग्रवाल यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे समन्वयन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पावन उदावंत आणि प्रा. डॉ. दीपक भाम्बेरे यांनी केले त्यांना माह्विद्यालायाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांच्या मार्गदर्शन लाभले.












आधाराश्रम, नाशिक
कार्यालय
प्रार्थना


वात्सल्य वृध्दाश्रम
7387386333 / 7276732449




राष्ट्रीय सेवा योजना
MET Bhujbal Knowledge City


राष्ट्रीय सेवा योजना
MET Bhujbal Knowledge City


वात्सल्य वृध्दाश्रम
7387386333 / 7276732449